जा.क्र. २९५६/२०१७

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

06 JUN 2017

**परिपत्रक क्र.** 503 **दिनांक** 6/6/2017

सरकारी कर्मचाऱ्यांच्या आचार संहितेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने डेप्युटी कमिशनर विरुध्द जे.हुसेन या एस.एल.पी.सिव्हील नं.१८२५१/२००६ या केस मधील निकालपत्रात असे स्पष्ट केले आहे की, "**सरकारी कर्मचाऱ्यास नोकरी वरुन काढून टाकले तर त्यांचे आत्यंतिक नुकसान होते हे खरे असले तरीही त्यांच्या गैरकृत्यास शिक्षा होणे देखील तितकेच अपरिहार्य आहे. कार्यालयातील शिस्त ही देखील त्या संस्थेच्या दृष्टीने तितकीच महत्वाची असते. म्हणून तिला अनुसरुन न वागणाऱ्या कर्मचाऱ्यास सेवामुक्त केले जाणे हे तत्व केव्हाही संयुक्तिक ठरते.** "

२. मा.सर्वोच्च न्यायालयाने या केसमध्ये ज्या वेगवेगळ्या प्रकरणांमधील घटनांचा संदर्भ घेतला आहे, त्यामध्ये प्रामुख्याने खालील प्रकारचे वर्तन गैर मानले गेले आणि असा कर्मचारी सेवामुक्त होण्यास पात्र होऊ शकतो असे सर्वोच्च न्यायालयाने ठरविले.

१. अधिकाऱ्यांच्या चेंबरमध्ये परवानगी न घेता नशेत असताना प्रवेश करणे.
२. प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन कामाच्या स्थळी वेळेवर न पोहोचणे.
३. घरगुती साहित्य वाहुन नेण्याचा खोटा दावा करुन रक्कम कार्यालयाकडून मिळविणे.

३. गैरवर्तन या सदराखाली मोडणारी अशी अनेक कृत्ये सेवामुक्ती सारख्या गंभीर शिक्षेस पात्र ठरु शकतात. जसे की, शासकीय रक्कमांचा भरणा वेळेत न करणे, मालमत्ता व दायित्व याबद्दल अधिकृत माहिती नियमितपणे सादर न करणे, दीर्घकाळ रजा न घेता गैरहजर राहणे, खोटी कारणे दाखवून वारंवार रजा मिळविणे, कामचुकारपणा करणे, इत्यादी.

४. न्यायालयांच्या अशा प्रकरणांतील निवाड्यावरुन असे स्पष्ट होते की शासकीय कार्यालयामध्ये वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करण्याची वृत्ती, परस्परांत स्नेहभाव आणि कार्यालयाची प्रतिष्ठा वाढेल असे वातावरण ठेवले जाणे आवश्यक आहे आणि याचे अनुपालन न करणारी व्यक्ती शिक्षेस पात्र होऊ शकते.

५. असे असूनही धर्मादाय संघटनेच्या विविध ठिकाणच्या कार्यालयांमध्ये काही असे अनुचित प्रकार घडल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत. ज्यामध्ये प्रामुख्याने अधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालन न करणे, अधिकाऱ्यांनी सांगितलेले काम नाकारणे किंवा असे काम करण्यास टाळाटाळ करणे, अधिकाऱ्यांविरुध्द खोटा आरोप करणे इत्यादी. असेही निदर्शनास आले आहे की अशा घटनांच्या संदर्भात कर्मचारी त्यांच्या प्रतिक्रिया सोशल मिडीयावर नोंदवितात आणि एक प्रकारे गैरकृत्याचा लेखी पुरावा तयार होतो. कर्मचाऱ्यांना काही वेळा अशा प्रतिक्रिया देण्यास प्रवृत्तही केले जात असते.

६. तरी सर्व कर्मचाऱ्यांनी उपरोक्त मा.सर्वोच्च न्यायालयाच्या तत्वप्रणालीचे पालन करुन धर्मादाय संघटनेची प्रतिमा डागाळली जाणार नाही याची काळजी घ्यावी आणि कार्यालयातील वातावरण निकोप राहील यासाठी प्रयत्नशील रहावे व प्रशासनास सहकार्य करावे.

(श.मा.सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
४. धर्मादाय संघटनेतील सर्व कर्मचारीवर्ग
५. कार्यालयीन नोंदवही